श्री कलंकिनी

# अभंगावली



।। श्री संत कलंकिनी बेबीनाथ माया ।।

॥ श्री सद्गुरु दत्त दुर्वास प्रसन्न ॥

# श्री कलंकिनी अभंगावली

॥ श्री गणेशाय नमः ॥ ॥ श्री गुरु ब्रम्हाय नमः ॥
॥ वैजनाथ रामकृष्ण ॥ ॥ ॐ सोहं परब्रम्हाय नमः ॥

१

गण गणपती । नाम जाणा स्फुर्ती ॥ नित्य गा प्रेरती । ज्ञान बोधा ॥१॥
ज्ञानाच्या संगाती । अज्ञान झडती ॥ मार्ग गा सुचती । जगण्याशी ॥२॥
पहिला हा गण । गणपती जाण ॥ देतो सत्य ज्ञान । आत्मा बोध ॥३॥
हाची सर्वां आधि । आराध्य गा साधी ॥ करी कृपा बोधी । ज्ञान रुपा ॥४॥
नाथ बेबी म्हणे । सर्वां आधि दाता ॥ हाची जगत्पिता । आधि देव ॥५॥

२

वंदू आधि देवा । आत्मरुपा भावा ॥ सर्वा आधि ठेवा । हाची पूर्ण ॥१॥
नित्य असे पूर्ण । कदा ना अपूर्ण ॥ हाची सत्य नित्य । आत्म रुपा ॥२॥
हाची गणपती । ओंकार गा स्फुर्ती ॥ वाणी याची कर्ती । आधि देवी ॥३॥
हिच ज्ञान शक्ती । मुळ आधि दाती ॥ प्रेरणा गा देती । प्रणव रुपा ॥४॥
प्रणव स्फुर्ती । हिच सरस्वती ॥ योग माया कर्ती । नारायणी ॥५॥
नाथ बेबी म्हणे । नर नारायणी ॥ एकची ही जानी । स्वयंभु गा ॥६॥

३

हारता मी देही । मग कळे ठाई ॥ कर्ती कोण राही । आपणात ॥१॥
देहिचा मी भाव । नसे कर्ता राव ॥ स्वयंभु तो देव । वेगळा गा ॥२॥
माझा मीचा स्फुरे । देह बुध्दि नुरे ॥ तोची खरा बारे । आत्माराम ॥३॥
तेथे निरागस । असे निराभास ॥ बुद्धि लवलास । नसेची गा ॥४॥
नाथ बेबी म्हणे । अवस्था ही पाही ॥ असे विदेही । साधका गा ॥५॥

४

साधक तो नुरे । असे सिध्द बारे ॥ आत्माराम हारे । परब्रम्ह ॥१॥
ब्रह्मी तो विलिन । नसे गा मलिन ॥ असे उदासीन । संसारी या ॥२॥
नसे तेथे ठसा । देही भाव असा ॥ मानव तो भासा । भासतसे ॥३॥
इकडचा नसे । परी तो गा दिसे ॥ सृष्टी नेम असे । म्हणुनिया ॥४॥
नाथ बेबी म्हणे । कार्या गा कारणी ॥ असे तो गा भानी ॥ इश इच्छे ॥५॥

५

भाना ठाई स्फुर्ती । मुळ असे कर्ती ।। तिची ती निर्मिती । मुळ माया ।।१।।

मानव आकृती । निमित्या भासती ।। कारणी आकारती । इश इच्छे ।।२।।

तिला चालवती । तिला बोलवती ।। मुळ आदिशक्ति । चालक गा ।।३।।

शक्तिच चालक । असे गा मालक ।। मानव तो देख । निमित्य गा ।।४।।

नाथ बेबी म्हणे । चालविता देव ।। बोलविता देव । आत्माराम ।।५।।

६

नुरे माझा मीचा। उरे आत्मा त्याचा ।। तोची गा दिलाचा । आत्मा राजा ।।१।।

तोची तारी मारी । सर्वेश्वर थोरी ।। त्याची ही लहरी । स्वयंभु गा ।।२।

हाती नाही काही । मानवी गा देही ।। चालविता पाही । तोची एक ।।३।।

तयाचे करावे । भजन स्मरण ।। तोची गा तारण । देही धारी ।।४।।

नाथ बेबी म्हणे । तोची आत्माराम ।। सखा ज्ञानेश्वर । ज्ञानदेव ।।५।।

७

ज्ञानाच्या संगती । ज्ञानबोध होती ।। अज्ञान झडती । देहिचे गा ।।१।।

देही अल्पमती । मानव विकृती ।। वासने संगती । रमती गा ।।२।।

हिला ती गा देणे । जाणिव गा जाणे ।। काम माझे म्हणे । आत्माराम ।।३।।

विरते पाहून । ममते कारण ।। स्मरण करून । देणे मज ।।४।।

नाथ बेबी म्हणे । सर्व नसे समान ।। दगड प्रमाण । पायरीचे ।।५।।

८

देवाच्या पायरी । दगडी जरी चिरे ।। तरी ते बारे । पवित्रची ।।१।।

छन्नीचे घालुनी । घाव याशी जाण ।। झाला महिमान । देव हाची ।।२।।

याशी वाया कसा । घालिन मी असा ।। दिलवर देहिचा । राजा मीची ।।३।।

माझे मीची केले । शुध्द हे राऊळ ।। प्रमाण हे देऊळ । जगताशी ।।४।।

नाथ बेबी म्हणे । देही हा निवासी ।। तया इच्छे श्वासी । तोची चाले ।।५।।

९

म्हणून नाही कुणी । मीच माझा धनी ।। देह बुध्दि जाणी । धरुनिया ।।१।।

बुध्दिचा चालक । असे हा मालक ।। इच्छे हा खेळ । खेळत गा ।।२।।

धन्याचा गा धनी । नाही कुणी जाणी ।। मालक त्रिभुवनी । एकची हा ।।३।।
मालकाचा मालक । कोण म्हणे चालक ।। सत्ताधारी एक । ईश्वर हा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । तया सत्तेपुढे ।। मानव हा रडे । अज्ञान गा ।।५।।

१०

शरण मी चरी । तुझ्या आत्म राया ।। विराट ती माया । तुझी देवा ।।१।।
मायेचे हे खेळ । तुझ्या रे केवळ ।। आम्हा तळमळ । व्यर्थची ही ।।२।।
सावरी तु माया । तुझी आत्मराया ।। ईश्वरी तो पाया । तुझा असे ।।३।।
सगुण निर्गुण निराकार। असे तुची थोर।। कळेनाच लहर । तुझी आम्हा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । चुकले बा पामर ।। क्षमा करी सत्वर । अज्ञाना या ।।५।।

११

नाशिवंत देही । भरवसा नाही ।। क्षणिक ही राही । देवराया ।।१।।
देई हिला बोध। काढुनिया खेद ।। तैसा नाही वाद । मिटणार ।।२।।
क्षणिक हे सुख । संसारी गा देख ।। मोह हा क्षणिक । सोडी जिवा ।।३।।
खरे शोधी हित । कैसे जाणा होत ।। तेथेची रमत । जीव भाव ।।४।।
नाथ बेबी म्हणे । सोडी जिवा भाव ।। मायिक ही हाव । नाशिवंत ।।५।।

१२

नाशी नासणार । शुध्द उरणार ।। जाणी हे अमर । भान दैवी ।।१।।
दिले जिवा भान । तुज शुध्द जाण ।। अमर हे ध्यान । रामाचे गा ।।२।।
राम तुज ठाई । शोधून तू पाही ।। आनंद हा घेई । तेव्हा कळे ।।३।।
क्षणिक हे नाते । मायेने बनते ।। येथे का फसते । खुळ्या मना ।।४।।
नाथ बेबी म्हणे । सोडी हा मोह ।। दावितो गा डोह । शेवटाशी ।।५।।

१३

सत्य बोले वाणी । स्वयंभु ही ध्वनी।। ईश्वरी गा जाणी । आधि दाती ।।१।।
माझी मी उरले । स्वयंम स्फुरले ।। जगती गा भले । आत्म तत्वी ।।२।।
देहीची मी नाही । शक्तिची मी ठाई ।। निराकार राही । स्वयंभु गा ।।३।।
माझा मीचा पत्ता । येणार नाही हाता ।। कर्ता मी लेखता । तत्त्वज्ञान ।।४।।
नाथ बेबी म्हणे। जाणती ती जाणे ।। मुळ माया म्हणे । आदि शक्ति ।।५।।

१४

माझी मज ठाई । जाणिव गा राही ।। म्हणून कर्ती ठाई । वेगळी गा ।।१।।
माझी मीची इच्छा । ब्रम्ह असे साक्षा ।। जाणती प्रत्यक्षा । कोण कैसे ।।२।।
उगा व्यर्थ चोरी । शब्द मारामारी ।। करणे यात थोरी । नाही कदा ।।३।।
उगा व्यर्थ बोल । खेळत नाही चाल ।। जाणून हे मोल । घ्यावे जिवा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । मायेचा हा खेळ ।। जाणा वेळोवेळ । देव हा कळे ।।५।।

१५

बोले आदिशक्ती। जगाची मी जगती ।। स्वयंभु गा खेळती । मुळ माया ।।१।।
कळेना मी कैसी । प्रणव गा स्फुर्ती ।। जगा गा नेणती । आधि दाती ।।२।।
असे निराकार । ब्रम्ह गा लहर ।। जाणीव ही धर । जिव प्राण्या ।।३।।
भक्तिची मी सखी । प्रणवी स्फुर्ती ।। जाणिव जे घेती । तया कळे ।।४।।
नाथ बेबी म्हणे । तिच्यात रंगले ।। माझी मी नुरले । कुन्ही एक ।।५।।

१६

मुळ पाहू जाता । नाही काही हाता ।। स्वयंभु ही स्फुर्ती । ज्ञान कळा ।।१।।
जाणती जाणिव । तिचे हे स्मरण ।। देती गा स्फुरण । तेव्हा कळे ।।२।।
चालते बोलते । शक्ति मी खेळते ।। इच्छे गा मांडते । शब्द वाणी ।।३।।
नुरे पुन्हा भान । जाणतीचे जाण ।। मग मज ध्यान । देणे येते ।।४।।
नाथ बेबी म्हणे । अगाध ही माया ।। करी काय काया । मानवी ही ।।५।।

१७

सावरी तु आई । माया तुझी ठाई ।। पेलवेना मही । जिवाला या ।।१।।
निवारी तु आई । दुःखिताचे दुःख ।। देई आता लेख । करू काही ।।२।।
सोडी भय भ्रांती । जाणून घे स्थिती ।। मानव ही माती । नाशिवंत ।।३।।
हित हिचे करी । घेऊ नको दोरी ।। ब्रह्म ही लहरी । जाणूनिया ।।४।।
नाथ बेबी म्हणे। आली जन्मा धारी ।। लाऊ नको उधारी । व्यर्थची ही ।।५।।

१८

देहिचा उध्दार । कर्तव्याने थोर ।। जाणीव ही धर । जिव प्राण्या ।।१।।
दिले गा कर्तव्य । करावे इतबारे ।। हेळसांड तया । करू नाही ।।२।।

इनामी असावा । नास्तिक नसावा ।। शुध्द गा असावा । वासनेत ।।३ ।।
वासना गा शुध्दि । काढील देही बाधी ।। हिच धरा बोधी । शुध्दिची गा ।४ ।।
नाथ बेबी म्हणे । वासना ही नाशी ।। लाविल कदा फाशी । कळेचिना ।।५ ।।

१९

शुध्दिचे साधन । नाम संकिर्तन ।। होतो गा निरसन । अभिमान ।।१ ।।
ठेवा नाम भक्ति । हिची मुळ साधन ।। मनाचे भेदन । हाची गुणे ।।२ ।।
चित्त शुध्दि पाहे । भक्तिविना नोहे ।। मार्ग हाची देहे । सापडे गा ।।३ ।।
बिज मंत्र ठाई । रामकृष्ण राही ।। सोडविता देही । हाची पाही ।।४ ।।
नाथ बेबी म्हणे । वाटे जिवा उणे ।। नामा विना जाणे । जिव प्राण्या ।।५ ।।

२०

मायेची ही देही । सत संगीराही ।। निर्मळ ती ठाई । नाम मंत्रे ।।१ ।।
नामाचे साधन । चित्ता देई ज्ञान ।। अभिमान गुण । निरसुनी ।।२ ।।
आकारली देही, पंचभुती राही ।। पंचतत्वी ठाई । व्यवहार हा ।।३ ।।
परी हिला नेम । सृष्टीचा गा जाण ।। वागावे हे भान । ठेऊनिया ।।४ ।।
नाथ बेबी म्हणे । नेमा नेमे वागे ।। संसार तो भोगे । सहजची गा ।।५ ।।

२१

अपेक्षेने वाढे । दुःखित ही पिडा ।। उगा व्यर्थ सुडा । पेटूनिया ।।१ ।।
निरपेक्षीत । ठेविता या मना ।। नुरे गा वासना । कल्पीत ही ।।२ ।।
तेथे चित्त शुद्धि । हारे देही बुद्धि ।। मनाची ही बाधी । निरसुनी ।।३ ।।
माझे मी पण । जाय गा निरसुन ।। जोडे शुध्द भान । आत्म तत्वी ।।४ ।।
नाथ बेबी म्हणे । हारे माझे पण ।। कळे आत्मज्ञान, ईश्वर हा ।।५ ।।

२२

नुरले गा भान, झाले गा आधिन ।। समाधि स्वाधीन । गुरुराये ।।१ ।।
पंचतत्वी जाण । झाले गा समान ।। यात हे साधन । राम देही ।।२ ।।
रामाची ही महि । रामाचीच देही ।। माझी मी ती नाही । कोठे काही ।।३ ।।
काय म्हणू जाता । भेटेल हा स्वतः ।। राम कोण भुता । लोपला हे ।।४ ।।
नाथ बेबी म्हणे । चराचरी राहे ।। राम तोची पाहे । आत्मानंदी ।।५ ।।

२३

नाही नाम रुप । आहे मी स्वरुप ।। मज पाहु रुप । माया तेथे ।।१।।

निर्गुण मी पाहे । निराकार राहे ।। सगुण तु मोहे । रामकृष्ण ।।२।।

तेथेची मी राहे । निराकारी पाहे ।। पत्ता माझा नोहे । हाता कुन्हा ।।३।।

अनुभव ठाई । हाची मी गा पाही ।। ब्रह्म तत्व राही । ज्ञान रुपा ।।४।।

नाथ बेबी म्हणे । वाटे मज उणे ।। तुझ्याविना बारे सुने । रमेचिना ।।५।।

२४

तुची आत्मज्योत । आणि प्रकाशात।। तुजविना रात। अंधकारी ।।१।।

नको हा अंधार । करी गा प्रखर ।। तेजी तुझा सार । परब्रह्मा ।।२।।

नको वाटे मना । अंधकारी भाना ।। देई नित्य खुणा । भाव शुद्धि ।।३।।

तुची नारायणा । जाणी ही भावना ।। राखी राखी मना । खुळ्याला या ।।४।।

नाथ बेबी म्हणे । नाम घेता मनी ।। नुरे चिंता जाणी ।। देहिची गा ।।५।।

२५

चुकली गा गाय । रडे धाय धाय ।। अडकले पाय । सोडवी गा ।।१।।

होई तळमळ । चालेना गा बळ ।। फासा हा केवळ । मायेचा गा ।।२।।

गुंतली गा पाय । फसली ही गाय ।। लागेना गा ठाय । कुन्ह्या गुणे ।।३।।

बांधली गा मोहे । मायेने ही पांहे ।। लोभ स्वार्थ राहे। देहिला गा ।।४।।

नाथ बेबी म्हणे । व्याकुळले जाणे ।। कोठे जावे म्हणे । गुरुराये ।।५।।

२६

नको वाटे फासी । जावे ध्यान घ्याशी ।। तेथेची गा काशी । गुरुराये ।।१।।

क्षणिक ही मोही । जाळिते गा देही ।। पेलवेना पाही । देवराया ।।२।।

सोडवी बा जिवा । करतो तुझा धावा ।। संसारी या भवा । सोसेचिना ।।३।।

खंत वाटे जिवा । काय करू देवा ।। रमेना या भवा । तुजविना ।।४।।

नाथ बेबी म्हणे । देई प्रेम धारा ।। मागे अवधारा । एवढेची ।।५।।

२७

कुणाचे हे धन । पुत्र कन्या जाण ।। मायेचे हे ध्यान । तारी काय ।।१।।

नित्य कसरती । पाहे आंत किती ।। स्वार्थी हिरे मती । जाणतिना ।।२।।

घेऊ देऊ करी । व्यवहार हे भारी ।। किंमत न धरी । प्रेमाची गा ।।३।।
रुसती फुगती । मना खिन्न करीती ।। नुरे प्रेम मती । तयात गा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । आवडेना जाण ।। ऐसे दुर्गुण । मज लागी ।।५।।

२८

हावी हावी मज । शुध्द प्रेमी चोज ।। यात तुझे तेज । गुरुराया ।।१।।
नको वाटे वाद । याने जिवा खेद ।। द्यावा तया बोध । भक्ति शुध्दि ।।२।।
आनंदची नंद । करी प्रेमा धुंद ।। नको वादावाद । मतीतांची ।।३।।
देई सत्भाव । अंतरीची ठेव ।। संकुचित भाव । काढुनिया ।।४।।
नाथ बेबी म्हणे । तुची सत दाता ।। जिवांचा गा पिता । परमात्मा ।।५।।

२९

गुरु परमेश्वर । असे गा सत्वर ।। तया वरी भार । जिवाचा गा ।।१।।
तोची एक देई । आत्म हित ठाई ।। तया विना नाही । राखिता गा ।।२।।
करी हित सार । आत्माराम थोर ।। घेतो पाहे भार । जिवा तुझा ।।३।।
ओळखी बा तया । ईश्वरी हा पाया ।। जाणून गा ठाया । वागावे गा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । जाणता जाणिव ।। देतो अनुभव । ठाईची गा ।।५।।

३०

ठाईचा तो देव । ठेवी तेथे भाव ।। देता अनुभव । ठाईची तो ।।१।।
तेथे ज्ञानबोध । काढी मना खेद ।। सोडी देही चोद । तेव्हा कळे ।।२।।
मारी अभिमान । देहिचा हा जाण ।। धरी शुध्द भान । आत्मारामी ।।३।।
ठाईची गा देव । असे ज्ञान ठेव ।। परी अनुभव । घेईचिना ।।४।।
नाथ बेबी म्हणे । आत्मा माझा देव ।। देई अनुभव । गुरु माझा ।।५।।

३१

गुरु हेची देव । आत्मारामी ठेव ।। दाविती गा भाव । ठेविलिया ।।१।।
गुरु परमेश्वर । आत्मा हा सत्वर ।। करी जिवा सार । हित अर्थी ।।२।।
जयाला कळला । आत्माराम थोर ।। तोची झेली भार । तयाचा गा ।।३।।
आत्मा हा ईश्वर । सकळात थोर ।। तयाची लहर । असे ही गा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । नाही माझे काही ।। आत्माची हा पाही । निरांजनी ।।५।।

ध्यासिला गा ध्यास । तोडीला गा फास ।। झाले गा उदास । संसारीया ।।१।।
जिर्ण झाली वृत्ती । वासनेची मती ।। शुध्द झाली प्रिती । रामराये ।।२।।
रामाची ही दासी । नित्य तया ध्याशी ।। चित्त आकाशी । राम माझा ।।३।।
राम सर्वेश्वर । तोचि दत्त थोर ।। करी माझा सार । जिवनाचा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । तयाची ही सखी ।। नित्य तया देखी । अंतरी गा ।।५।।

३३

आंतरीचा सखा । माझा प्राण देखा ।। तयाच्या या सुखा । नित्य मी गा ।।१।।
माझी मी नुरले । शक्ति गा भरले ।। प्रणव खुलले । आत्माराम ।।२।।
रामाचा मी दास । प्रणव साक्षास ।। स्वयंभु स्वरास । तोची एक ।।३।।
देई गा उच्चार । प्रणवी साचार ।। ओंकार सत्वर । आपणची ।।४।।
नाथ बेबी म्हणे । ओंकार हे बीज ।। असे ब्रह्म तेज । तयाचे गा ।।५।।

३४

ओंकारापासूनी । उत्पत्ती झाली ।। बिज मंत्र आली । स्वयंभु गा ।।१।।
भासला गा जन्म । आजन्मी जाण ।। शक्तिचा महिमान । अनुभवा ।।२।।
देही पंचभुती । अज्ञान ही स्थिती ।। मातीत रमती । देखवेना ।।३।।
म्हणून गुरुस्मृती । जाणिव गा देती ।। मागील कर्म गती । पुसती गा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । मागिल गा योग ।। आली तया जाग । गुरुकृपे ।।५।।

३५

कर्मयोगे आली । झाली शक्ति जागी ।। हितासाठी भोगी । संसार गा ।।१।।
देहिला गा भास । संसारी ही आस ।। पुरविला ध्यास । तियेचा गा ।।२।।
तिच्यासाठी आले । जन्मी गा भासले ।। इच्छे गा नुरले । आता काही ।।३।।
माझी मी जाणती । स्वयंभु स्फुर्ती।। अनादी काळाची । मुळ माया ।।४।।
नाथ बेबी म्हणे । विरला गा भाव ।। देही मिची हाव। पूर्णत्वी गा ।।५।।

३६

उरली गा भासी । देही निमित्याशी ।। आंतर आकाशी । मुळ माया ।।१।।
माया मायातित । आसुनी दिसत ।। संसारी भासत सृष्टी नेमे ।।२।।

देहिला गा लागु । सृष्टी नेमू भोगु ।। मर्यादा ही त्यागु । सांगा कैची ।।३।।
जन्मा जी का आली । तिला भोग दिली ।। माझी मी निराळी । उरले गा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । आता गा नुरली ।। भेदाभेद सरली । मी तु पणा ।।५।।

३७

शुध्द आली चित्ती । गेली भय भिती ।। झाली गा निश्चिंती । देह माया ।।१।।
देही ही गा मायिक । असे गा कायिक ।। मोहमाया देख । सृष्टी नेमे ।।२।।
परी गा झुंजले । वासने तांडिले ।। तंडन गा केले । देहधारी ।।३।।
नाम मंत्र दिले । दोरीत धरीले ।। लगामी खेचले । वासने गा ।।४।।
शुध्द त्यांना केले । निष्कामी ठेविले ।। देही गा स्मरले । इच्छा शक्ति ।।५।।
नाथ बेबी म्हणे । गुरुकृपे जाणे ।। भान शुध्दी आले । देहिला गा ।।६।।

३८

आता गा नुरले । देही भेद सरले ।। शक्तिने उरले । मुळ माया ।।१।।
माया मायातित । म्हणे मी स्थित ।। विदेही बोलत । आत्म तत्वी ।।२।।
नारी मीची नर । इच्छे गा आकार ।। कार्या गा कारण । धरीतसे ।।३।।
मुळ पाहु जाता । नाही येत हाता ।। निराकार सत्ता । कळे कुन्हा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । शक्तिची ही सत्ता ।। विश्वचर राहाता । सर्व असे ।।५।।

३९

माझी मी जाणती । स्वयंभु गा स्फुर्ती ।। इच्छे कार्य करती। ब्रह्म स्थिती ।।१।।
नामरुप नाही । मजला गा काही ।। निराकार राही । लहरी मी ।।२।।
वायु रुपा राही । दिसत गा नाही ।। जाणता गा ठाई । जाणतसे ।।३।।
नाथ बेबी म्हणे । मायेची ही लिला ।। जाणत्या गा विना । कळेचिना ।।४।।

४०

जाणता जाणीव । घेतो अनुभव ।। ठाईचा तो देव । देखुनिया ।।१।।
सगुण निर्गुण । एकची तो भाव ।। ठेविलीया देव । कळतसे ।।२।।
अंतरीचा देव । आत्मा अनुभव ।। ज्ञानरुपा ठेव । तोची देतो ।।३।।
लाभलिया कृपा । सद्गुरु देखा ।। मगची तो लेखा । आत्मज्ञानी ।।४।।
नाथ बेबी म्हणे । आत्मा हाची ज्ञानी ।। देतो बोध जाणी । अज्ञान या ।।५।।

## ४१

होता गा जागृती । बोले आत्मा प्रिती ।। स्वयंभु गा स्फुर्ती । तयाची ही ।।१।।
हारे देह बुध्दी । तेव्हा आत्मा सिध्दी ।। काढुनिया बाधी । बोलतसे ।।२।।
देही भाव मिथ्या । आत्मभाव सत्य ।। असे तोची नित्य । ब्रह्मरुपा ।।३।।
विलिन तो ठाई । ब्रह्म असे पाही ।। देही भाव ठाई । विसरुनी ।।४।।
नाथ बेबी म्हणे । बोलती ही पाही ।। ब्रह्म लहरी ठाई । गुरुकृपे ।।५।।

## ४२

देहिचे हे नाही । निमित्त ही पाही ।। देही माया राही । कारणा गा ।।१।।
देहिची ही माया । नाशिवंत काया ।। परी मुळ माया । अविनाशी ।।२।।
आदिशक्ति ठाई । मुळ माया राही ।। देहिची ही नाही । भाव स्थिती ।।३।।
देही ही गा माती । हिला अल्पमती ।। अज्ञान गा स्थिती । हिची असे ।।४।।
नाथ बेबी म्हणे । परी ज्ञान दाती ।। मुळ माया शक्ति । दिगंबरी ।।५।।

## ४३

महायोगिनीची । असे ज्ञान स्मृती ।। माझी मी गा कर्ती । म्हणू कैशी ।।१।।
इच्छेने गा आली । ज्ञान स्मृती दिली ।। स्वये ती बोलली । महामाया ।।२।।
सहज ती बोले । आध्यात्म गा खुले ।। ओवी बोध डुले । तिये कृपे ।।३।।
स्वयंभु ही ओवी । कृपे तिच्या भावी ।। मुळ महादेवी । जगती ती ।।४।।
नाथ बेबी म्हणे । कर हे गा वळे ।। सहज गा जुळे । कृपे जाण ।।५।।

## ४४

स्वयंभु ही वाणी । मायेची ही जाणी ।। निमित्या कारणी । मानव ही ।।१।।
मानव ही कुढी । करी काय रडी ।। अज्ञान ही बेडी ।। मायिक गा ।।२।।
मायिक ही देही । मायेनेच राही ।। सृष्टी नेमे पाही । लागुनिया ।।३।।
शक्तिची ही स्थिती । शुध्द ज्ञान मोती ।। रत्न ही ओकती । कृपेने गा ।।४।।
नाथ बेबी म्हणे । सत्संग जाणे ।। हिचा देही म्हणे । दिनराती ।।५।।

## ४५

शक्तिची ही स्थिती। गुरुकृपे बाणती।। ब्रह्म शक्ती खुलती । प्रणवी गा ।।१।।
प्रणव ही स्थिती । ओंकार खुलती ।। सहज बोलती । ब्रह्मवाक्य ।।२।।